# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

**E**

## बी. ए. – (विशारद) सामाजिकशास्त्रे

**परीक्षा : मे – २०२२**

**द्वितीय वर्ष**

**सत्र – ३**

**विषय:– मराठी साहित्य (भाग–१) (शबरी, विशाखा, व्यक्ती आणि वल्ली) (BMG-301)**

**दिनांक:** २३/ ०५/२०२२ **गुण :** १०० **वेळ :** दु.२.०० ते दु. ५.३०

**सूचना :** १. सर्व प्रश्न सोडवा.

**प्रश्न १ खालील संकल्पना स्पष्ट करा. (कोणत्याही १०)** (२०)

१. कादंबरी या साहित्यप्रकाराची व्याख्या सांगा.
२. शबरी कादंबरीतील गौण पात्र सांगा.
३. शबरी कादंबरीतील प्रधान पात्र सांगा.
४. कादंबरी या साहित्यप्रकाराच्या रचनेसाठी आवश्यक घटक कोणते? ते सांगा.
५. कुसुमाग्रजांचा कोणकोणत्या विशेषणांनी उल्लेख केला जातो.
६. विशाखा या काव्यसंग्रहातील सामाजिक जाणिवेच्या कवितांची नावे सांगा.
७. पु. ल. देशपांडे यांच्या व्यक्तीमत्त्वाचे विविध पैलू सांगा.
८. पु. ल. देशपांडे यांच्या विनोदी लेखसंग्रहाची नावे सांगा.
९. व्यक्ती आणि वल्ली या शिर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.
१०. व्यक्तीचित्रे या लेखनप्रकाराचा उद्देश सांगा.
११. प्रथमपुरुषी निवेदक ही संकल्पना स्पष्ट करा.
१२. तृतीयपुरुषी निवेदक ही संकल्पना स्पष्ट करा.

**प्रश्न २ टिपा लिहा. (कोणत्याही चार)** (२०)

१. विभावरी शिरूरकर यांची सीहित्यसंपदा
२. शबरी कादंबरीची निवेदनपद्धती
३. कुसुमाग्रजांची वाङ्मयीन कामगिरी
४. टिळकांच्या पुतळ्याजवळ या कवितेचा भावार्थ
५. नंदा प्रधान

**प्रश्न ३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** (४५)

१. ‘व्यक्ती आणि वल्ली’ तील व्यक्तीरेखामध्ये वैविध्य आहे. या विधानाचा परामर्श घ्या.
२. ‘ते चौकोनी कुटुंब’ या लेखातून पु.ल. देशपांडे यांना काय सुचवायचे आहे? ते सांगा.
३. ‘पृथ्वीचे प्रेमगीत’ या कवितेचे रसग्रहण करा.
४. ‘शबरी’ या कादंबरीतील मध्यमवर्गीय समाजजीवनाची वैशिष्टये सांगा.

**प्रश्न ४ दिर्घ निबंध / सविस्तर उत्तर लिहा. (कोणतेही एक)** (१५)

१. शबरी ही नायिकाप्रधान कादंबरी आहे. या विधानाचा परामर्श घ्या.
२. ‘विशाखा’ मधील प्रेमकवितांची वैशिष्ट्ये लिहा.

---